जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, गोंदिया

दुरध्वनी क्रमांक : (०७१८२) २३३३८८
E-mail :- pdgondia@yahoo.co.in

ई-निविदा सुचना

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,गोंदिया

निविदा सुचना क्रमांक ०१/२०१५-१६

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,कार्यालय गोंदियाच्या अधिनस्त सर्व खंड विकास अधिकारी मार्फत राबविण्यात येणा-या इंदिरा आवास योजना सन-२०१५-१६ च्या घरकुल योजनेचे लाभार्थ्याच्या घरावर योजनेचे नाफलक (लोगो) लावण्याकरिता नामफलक खरेदी करावयाचे आहे. त्यासाठी ऑनलाईन दोन लिफापे पध्दतीने अधिकृत पुरवठादार यांचे कडून ई-निविदा व्दारे दर मागविण्यात येत आहे.

तपशिल

अ.क्रं.	कार्यालयाचे नाव	साहित्याचे नाव	पुरवठा करावयाचे साहित्याचे अंदाजित संख्या	अनामत
१	जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,गोंदिया,सेलटॅक्स कॉलोनी,फुलचुर पेठ, गोंदिया	नामफलक (लोगो) १.आकार-१८"x६"x ०.५ mm २.मटेरीअलचे वर्णन-पॉवर कोटींग ३.लोगोचे सविस्तर तपशिल परिशिष्ट ब प्रमाणे आहे.	७५८७	रु.४०,०००/-
एकूण			**७५८७**	**रु.४०,०००/-**

निविदेची माहिती खालील प्रमाणे-

१) सदर निविदेची कोरी निविदा (निविदा प्रपत्र 'अ' व 'ब') http:mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या इंटरनेट बँकिंग व्दारे कोरी निविदेची रक्कम रु.५००/- व अनामत रक्कम रु.४०,०००/- भरणे आवश्यक राहील.

२) निविदा धारकास ऑनलाईन कोरी निविदा, निविदेची रक्कम ऑनलाईन उपलब्ध असलेल्या बँक खात्यात रक्कम भरल्यानंतर दिनांक~~२९/०१/१६~~ते दिनांक-~~०५/०२/१६~~पर्यंत कार्यालयीन वेळेत कोरी निविदा प्राप्त होईल.

३) भरलेली ई-निविदा दिनांक~~२९/०१/१६~~ते दिनांक-~~०५/०२/१६~~पर्यंत दुपारी २.०० वाजेपर्यंत ऑनलाईन सादर करणे आवश्यक राहील.

४) निविदेच्या अटी व शर्ती परिशिष्ट 'अ' व खरेदी करण्यात असलेल्या लोगोचे वर्णन परिशीष्ट 'ब' प्रमाणे आहे.

५) ई-निविदा दिनांक-~~०५/०२/१६~~-रोजी दुपारी ३.०० वाजता किंवा दुस-या दिवशी दुपारी १२.०० वाजता निविदा उघडण्यात येईल तरी नमूद दिनांकास निविदा धारक किंवा त्याचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

प्रकल्प संचालक
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
गोंदिया

कार्यकारी अध्यक्ष
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,गोंदिया

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, गोंदिया

दुरध्वनी क्रमांक : (०७१८२) २३३३८८
E-mail :- pdgondia@yahoo.co.in

ई-निविदा सुचना

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,गोंदिया

निविदेचे नियम, अटी व शर्ती खालील प्रमाणे

परिशिष्ट 'अ'

१) संपूर्ण निविदा प्रक्रीया ही ऑनलाईन (ई-टेंडरीग) पध्दतीने राहील

२) निविदे संदर्भातील कागदपत्रे, अटी व शर्ती यांची माहिती पाहण्यासाठी किंवा डाऊनलोड करण्यासाठी http: Mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक २९/०१/१६ ते दिनांक ०५/०२/१६ रोजी दुपारी २.०० वाजेपावेतो उपलब्ध होईल.

३) सदर कामाची निविदा दिनांक ०५/०२/१६ रोजी दुपारी ३.०० वाजता किंवा दुस-या दिवशी दुपारी १२.०० वाजता इलेक्ट्रॉनिक फॉरमॅट मध्ये http:mahatenders.gov.in या वेबसाइटवर मा.कार्यकारी अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, गोंदिया यांच्या उपस्थितीत जिल्हा परिषद,गोंदिया कार्यालयात उघडण्यात येईल.

४) ई-निविदा ऑनलाईन दोन लिफाफे पध्दतीने सादर करणे आवश्यक राहील.

अ) तांत्रिक लिफापा :-

तांत्रिक लिफाप्यामध्ये खालील प्रमाणे pdf फाईलमध्ये अभिलेख सादर करणे आवश्यक राहील.

१) कोरी निवविदेची रक्कम रु.५००/- व अनामत रक्कम रु.४०,०००/-Online उपलब्ध असलेल्या इंटरनेट बॅकिंग व्दारे भरणा केलेल्या UTR क्रमांकाची पावती.

२) वैध दुकान नोंदणी प्रमाणपत्र.

३) खरेदी करण्यात येत असलेले साहित्य तयार करण्यासाठी यंत्र सामुग्री उपलब्ध असल्याचे लेटर हेडवर प्रमाणपत्र.

४) सन-२०१४-१५ चे आयकर भरणा केल्याची अभिलेखे.

५) पॅन कार्ड.

६) VAT नोंदणी प्रमापत्र व रिटर्न (Latest)

७) इंदिरा आवास योजने अंतर्गत लोगो पुरवठा केल्याचा कमीत कमी ३ जिल्हयाचा अनुभव असणे बंधनकारक आहे. (पुरवठा आदेशाची प्रत सोबत सलग्न करावे.)

८) लोगो चा नमुना तपासणी साठी या कार्यालयास दि.०४/०२/१६-ला दुपारी १२.०० वाजेपर्यंत सादर करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय तांत्रिक लिफापा उघडला जाणार नाही.

उपरोक्त प्रमाणे १ ते ७ सर्व कागदपत्रे लिफापा क्रमांक १ मध्ये सादर केल्याशिवाय लिफापा क्रमांक २ उघडण्यात येणार नाही. तसेच मुद्दा क्रं.८ नुसार नमुद कालावधीत लोगो चा नमुना सादर करणे बंधनकारक आहे.

ब) व्यापारी लिफापा (दराचा लिफापा)

पुरवठा करावयाचे साहित्याचे दर ऑनलाईन उपलब्ध असलेल्या Excel Sheet मध्ये सादर करणे आवश्यक राहील.

५) मुद्या क्रमांक ४ मधिल १ ते ८ प्रमाणे सर्व अटी व शर्तीची पुर्तता निविदा अर्ज सादर करतांना करण्यात यावी. मुदतीनंतर कोणतीही कागदपत्रे स्विकारली जाणार नाही. अटी व शर्तीत नमुद केलेल्या अर्हतेपेक्षा कमी अर्हता आढळल्यास निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

६) निविदे मध्ये कोणतेही अट किंवा पर्याय निविदा धारकास देता येणार नाही. उपकंत्राट देता येणार नाही. तसेच एकापेक्षा जास्त दर नमुद करता येणार नाही असे झाल्यास सदर निविदा विचारात घेती जाणार नाही.

७) निविदा उघडण्याच्या वेळी तिनपेक्षा कमी ग्राहय निविदा प्राप्त झाल्यास अल्प प्रतीसादामुळे निविदेस पुन्हा मुदतवाढ देण्यात येईल. फेर निविदा सुचनेव्दारे अथवा संपूर्ण निविदा प्रक्रीयाच रद्द करण्यात येईल. याबाबतचे संपूर्ण अधिकार कार्यकारी अध्यक्ष,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,गोंदिया यांनी राखुन ठेवले आहेत.

८) शासनाने लोगोचे आकार १८"x६"x ०.५ mm निश्चित केल्याप्रमाणे असेल. सदर लोगो/फलक (G.C./Power Coating) पॉवर कोटींग मटेरीअलचे असावे.

९) लोगो फलकाचा सविस्तर तपशिल परीशिष्ट 'ब' प्रमाणे आहे.

१०) नविदा मंजुर न झाल्यास जमा केलेली इशारा रक्कम अंतिम निर्णय झाल्यावर बिनव्याजी निविदा धारकाची अनामत रक्कम सुरक्षा रकमेमध्ये वळती करण्यात येईल.

११) निविदा मंजुर न झाल्यास जमा केलेली इशारा रक्कम अंतिम निर्णय झाल्यावर बिनव्याजाची निविदा धारकाच्या लेखी विनंतीनुसार परत करण्यात येईल. विलंब शुल्क व्याजाची मागणी निविदा धारकास करता येणार नाही. कामाचे दर निविदा प्रपत्रात अंकी व अक्षरी रुपये सुस्पष्ट नमुद करावे.

१२) निविदा धारकास अग्रीम रक्कम अदा करण्यात यंणार नाही. तथापी निविदा धारकाने सादर केलेल्या देयकानुसार पूर्ण सहानिशा करुन जी रक्कम देय राहील ती अदा केली जाईल,

१३) न्यूनतम दा सादर करणा-या निविदा धारकास त्याचे दर मंजुरी नंतर एक दिवसाच्या आत १०० रुपयाचे स्टँप विहित मुदतीत करारनामा न कल्यास त्याचा निविदा मंजुरीसाठी/ कामासाठी विचार केला जाणार नाही. व लगतच्या न्यूनतम निविदा धारकाचे दर मंजुर करण्यात येईल.अशाप्रकारे जादा द्यावे लागणारे दराची/रकमेची वसुली पहील्या निविदा धारकाकडून करण्यात येईल.

१४) पूरेशा अनुदाना अभावी अथवा ईतर कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास निविदा धारकास जादा रकमेची व्याजाची मागणी करता येणार नाही.

१५) निविदा धारकाने पंचायत समिती स्तरावर साहित्य सुस्थितात पुरवठा करुन पोहोच सादरकेल्यानंतर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,कार्यालया मार्फत देयक अदा करण्यात येईल.

१६) भारत सरकार वित्त मंत्रालय यांचे आयकर अधिनियम १९६१ च्या सेक्शन १९४ व तदनंतरच्या आदेशानुसार आयकराची रक्कम विहित दराने निविदा धारकाकडून देयक अदा करतेवेळी कपात (TDS) करण्यात येईल. ते निविदा धारकास बंधनकारक राहील.

१७) एकदा सादर केलेले दर हे कायम राहतील. कच्चा माल, इंधन, वाहतुक कर इत्यादी व अनुषांगीक खर्चात वाढ झाल्यास मंजुर दरामध्ये बदल होणार नाही.

१८) निविदेतील अटी व शर्तीमध्ये तसेच तपशिल मध्ये व आराखडया मध्ये फेरबदल करण्याचे अधिकार कार्यकारी अध्यक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,गोंदिया यांनी राखुन ठेवलेले आहेत.

प्रकल्प संचालक
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
गोंदिया

कार्यकारी अध्यक्ष
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,गोंदिया

परिशिष्ट ब

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ,गोंदिया

इंदिरा आवास योजना

(भारत सरकार तथा महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचा संयुक्त उपक्रम)

लाभार्थ्याचे नाव :- ----------

गाव :- ---------- पंचायत समिती ----------

बी.पी.एल. नं. :- ---------- वर्ष ---------- अनुदान ----------